## प्रकरण तिसरे

### ऊसतोड कामगारांची तोंडओळख, स्वरूप व प्रमाण


३.१ प्रास्ताविक

३.२ ऊसतोड कामगारांचे प्रकार व प्रमाण

३.३ ऊसतोड कामगारांची तोंडओळख

३.४ ऊसतोड कामगारांच्या स्थलांतरची भौगोलिक रचना, प्रमाण व स्वरूप

संदर्भ

## प्रकरण तिसरे

## ऊस तोड कामगारांची तोंडओळख, स्वरूप व प्रमाण

### ३.१ प्रास्ताविक :

ऊस तोड कामगारांच्या सामाजिक आर्थिक सर्वेक्षणातून जे तथ्य संकलन करण्यात आले व संकलित केलेल्या तथ्यांचे जे सारणीकरण करण्यात आले आहे त्याच्या आधारावर या प्रकरणात ऊस तोड कामगारांचे प्रकार, ऊस तोड कामगारांची परिचयात्मक माहिती, त्यांचे स्वरूप व प्रमाण या विषयी वर्णन केलेले आहे. या प्रकरणाचे एकूण तीन उपविभाग केलेले आहेत. पहिल्या विभागात एकूण उत्तरदात्या ऊस तोड कामगारांचे प्रकार व प्रमाण यांचे वर्णन केलेले आहे. दुसऱ्या विभागात ऊस तोड कामगारांची कौटुंबिक वैशिष्टये किंवा परिचयात्मक माहिती यांचे वर्णन केलेले आहे. तिसऱ्या विभागात स्थलांतरीत ऊस तोड कामगारांचे स्वरूप, प्रमाण व स्थलांतराची कारणे यांचे वर्णन केलेले आहे.

### ३.२ ऊस तोड कामगारांचे प्रकार व प्रमाण :

ऊस तोड कामगारांच्या सामाजिक आर्थिक सर्वेक्षणातून असे आढळून आले की, कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस तोडणीचे काम करणारे काही कामगार स्थानिक आहेत. व काही कामगार स्थलांतरीत आहेत. एकूण स्थानिक व स्थलांतरीत कामगारांपैकी काही बैलगाडीवानही आहेत. या सर्वांचे प्रमाण कोष्टक क्रमांक ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

कोष्टक क्र. ३.१

ऊस तोड कामगारांचे प्रकार व प्रमाण यानुसार वर्गीकरण

| अनु. | प्रकार | ऊस तोड कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | स्थानिक कामगार | १० | ११.११ |
| २. | स्थलांतरीत कामगार | ८० | ८८.८९ |
| | एकूण | ९० पैकी | १००.०० |
| ३. | बैलगाडीवान | १५ | १६.६६ |

कोष्टक क्र. ३.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ९० उत्तरदात्या ऊस तोड कुटुंबापैकी १० ऊस तोड कुटुंबे ही स्थानिक आहेत. म्हणजे सर्वेक्षणापैकी ११.११ प्रतिशत कुटुंबे स्थानिक आहेत. यापैकी ५ स्थानिक ऊस तोड कुटुंबे तासगांव विभागातील मांजर्डे या गावची आहेत व ५ स्थानिक ऊस तोड कुटुंबे कुमठे या विभागातील व कुमठे या गावचीच बैलगाडीवान आहेत. कुमठे हे गांव कारखान्यापासून १५ कि.मी. अंतरावर म्हणजे तसे जवळच असल्याने ही कुटुंबे ऊस तोडणी व स्वत:च्याच बैलगाडीच्या सहाय्याने ऊस वाहतूक असे दुहेरी काम करीत आहेत.

तसेच सर्वेक्षणातील एकूण ९० उत्तरदात्या ऊस तोड कुटुंबापैकी ८० कुटुंबे ही स्थलांतरीत आहेत. त्यांचे एकूण ऊस तोड कामगार कुटुंबाशी प्रमाण ८८.८९ टक्के इतके आहे. यावरून असे अनुमान काढता येईल की, एकूण ऊस तोड कुटुंबामध्ये स्थानिक ऊस तोड कुटुंबाचे प्रमाण अल्प आहे व

स्थलांतरीत कुटुंबांचे प्रमाण जास्त आहे. स्थलांतरीत ऊस तोड कुटुंबांचे स्वरूप व त्यांच्या स्थलांतराची कारणे या विषयीचे सविस्तर वर्णन याच प्रकरणातील तिसऱ्या विभागात केलेले आहे.

सर्वेक्षणातील एकूण ९० उत्तरदात्या ऊस तोड कुटुंबांपैकी १५ कुटुंबे ही बैलगाडीवान आहेत. बैलगाडीवान हे कारखान्याचे कंत्राटदार व ऊस तोड कामगार म्हणूनही ओळखले जातात. बैलगाडीवान हे स्थानिकही असतात व स्थलांतरीतही असतात. स्थानिक व स्थलांतरीत बैलगाडीवान कुटुंबांचे एकूण ऊस तोड कुटुंबाशी प्रमाण १६.६६ टक्के इतके आहे. बैलगाडीवान कुटुंबे ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील कोल्हापूर, कोकण, अहमदनगर या भागातून व महाराष्ट्र राज्याच्या सीमेनजीक असणाऱ्या परंतु कर्नाटक राज्यातील बेळगांव व विजापूर जिल्ह्यातून येत असतात असे कंत्राटदार व कारखान्याच्या शेतकी ऊस तोड व वाहतूक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितलेल्या माहिती वरून आढळून येते. परंतु सर्वेक्षणामध्ये मात्र बैलगाडीवानाचे जास्त प्रमाण या भागातील आढळून येत नाही. कारण सर्वेक्षण हे कारखान्याच्या गळीत हंगामाच्या सुरूवातीस केलेले असल्याने अजून बरेच बैलगाडीवान यावयाचे होते. त्यामुळे त्यांचे एकूण ऊस तोड कामगारांशी प्रमाण (१६.६६ टक्के पेक्षा) जास्तही असण्याची शक्यता आहे.

१५ बैलगाडीवान कुटुंबांपैकी १२ (८० टक्के) कुटुंबे ही महाराष्ट्र राज्यातील असून, त्यापैकी आठ सांगली, जिल्ह्यातील, एक कोल्हापूर जिल्ह्यातील व तीन बीड जिल्ह्यातील आहेत. तर तीन बैलगाडीवान कुटुंबे (२० टक्के कुटुंबे) ही कर्नाटक राज्यातील बेळगांव या जिल्ह्यातील आहेत. तसेच १५ गाडीवान कुटुंबांपैकी ५ (३३.३३ टक्के) कुटुंबे ही स्थानिक आहेत व १० (६६.६७ टक्के) कुटुंबे ही स्थलांतरीत आहेत. यांचे स्थलांतराचे स्वरूप व कारणे या विषयीचे वर्णन याच प्रकरणातील तिसऱ्या विभागात केलेले आहे.

### ३.२.१ एकूण उचलदात्या ऊस तोड कामगारांचे स्वरूप -

यामध्ये स्थानिक, स्थलांतरीत व बैलगाडीवान उचलदाते ऊस तोड कामगार ऊस तोडणीचे काम एकटे एकटे करतात की आपल्या कुटुंबासह करतात, याविषयीचे वर्णन केले आहे. कोष्टक क्रमांक ३.२ मध्ये दाखविल्याप्रमाणे

कोष्टक क्र. ३.२

उचलदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचे स्वरूपानुसार वर्गीकरण

| अनु. | | एकटा | कुटुंबासह | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंबा-शिवाय | केवळ पत्नी व लहान मोठया मुलांसह | पत्नी व इतर नातेवाई-कासह | |
| १. | ऊस तोड कामगार कुटुंबाची संख्या | १६ | ४३ | ३१ | ९० |
| २. | शेकडा प्रमाण | १७.७८ | ४७.७८ | ३४.४४ | १०० |

एकूण ९० उचलदात्या ऊस तोड कामगार कुटुंबापैकी १६ उचलदाते एकटेच कुटुंबा-शिवाय ऊस तोडणीचे काम करीत आहेत. अशा कामगारांचे एकूण उचलदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाशी प्रमाण १७.७८ टक्के इतके आहे. ऊस तोडणीच्या कामामध्ये अशा एकटया एकटयांच्या काही टोळ्या असतात. अशा टोळीतील कामगारांचा दररोजचा स्वयंपाक तयार करण्यासाठी त्यांना स्वयंपाकाचा वेगळा रोजगार दिला जाईल, या अटीवर एक किंवा दोन स्त्रिया बरोबर आणलेल्या

असतात. तसेच काही कुटुंबे पती पत्नी, त्यांची लहान मुले व लहान मुलांना सांभाळणारे एखादे मोठे मूल अशीही आहेत. पत्नी सर्वांचा स्वयंपाक करून पतीला ऊस तोडणीच्या कामास मदत ही करीत असते. या प्रकारच्या कामगार कुटुंबांची संख्या ४३ इतकी असून, त्यांचे एकण उत्तरदात्या ऊस तोड कामगारांशी प्रमाण ४७.७८ टक्के इतके आहे. तसेच सर्वेक्षणामध्ये असेही आढळून आले की, काही ऊस तोड कामगारांच्या बरोबर पत्नी व त्याच बरोबर इतर नातेवाईक (स्त्री-पुरूष) कुटुंबिय असतात. उदा. उत्तरदात्याची आई, वडील, बहिण, भाऊ, भावजई, मुलगा व मुलगी वगैरे. हे कुटुंबिय कुटुंबात राहून ऊस तोडणीचे काम करीत असतात. अशा कुटुंबांची संख्या ३१ इतकी असून त्यांचे सर्वेक्षणाच्या एकण कुटुंबाशी प्रमाण ३४.४४ टक्के इतके आहे. यावरून हे स्पष्ट होते की, ऊस तोडणीच्या कामामध्ये एकटे एकटे काम करणाऱ्या कामगारांची संख्या अल्प असून पत्नी व इतर कुटुंबिय यांच्यासह ऊस तोडणीचे काम करणाऱ्या कामगारांची संख्या अधिक आहे.

## ३.३ ऊस तोड कामगारांची तोंडओळख :

या विभागामध्ये उत्तरदात्या ऊस तोड कामगारांची परिचयात्मक माहिती, कौटुंबिक वैशिष्टये यांचे वर्णन केलेले आहे. तसेच उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबातील एकण कामगार संख्येपैकी स्त्री कामगार किती ? पुरूष कामगार किती ? प्रत्येक कुटुंबात काम करणाऱ्यांची संख्या (मिळविते) किती ? काम न करणाऱ्यांची संख्या (अवलंबित) किती ? हे तपासून पाहून त्यांची संख्या व प्रमाणही दिलेले आहे.

### ३.३.१ ऊस तोड कामगारातील स्त्री-पुरूष प्रमाण -

ऊस तोडणी कामगार कुटुंबाचे सर्वेक्षण करून एकत्रित केलेल्या माहितीवरून असे आढळून येते की, उत्तरदात्या कुटुंब प्रमुख पुरूष कामगारा बरोबरच

त्यांची पत्नी व इतर कुटुंबिय स्त्रीपुरुषही ऊस तोडणीचे काम करीत असतात. पुरुषांबरोबर स्त्रियाही ऊस तोडणीसारखी शारीरिक कष्टाची कामे करीत असतात.

कोष्टक क्र. ३.३

ऊस तोड कामगारांचे लिंगानुसार वर्गीकरण

| | ऊसदाते ऊस तोड कामगार | | | कुटुंबाबरोबरचे इतर नातेवाईक कामगार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| | ९० | - | ९० | २३ | ८१ | १०४ = १९४ |
| शेकडा प्रमाण | १००.०० | - | १००.०० | २२.१२ | ७७.७८ | १००.०० |

कोष्टक क्रमांक ३.३ मध्ये दाखविल्याप्रमाणे सर्वेक्षण केलेल्या एकूण ९० ऊस तोड कामगार कुटुंबामध्ये एकूण काम करणाऱ्यांची संख्या १९४ इतकी आहे. यापैकी एकूण पुरुष कामगारांची संख्या ११३ म्हणजे एकूण ऊस तोड कामगारांशी एकूण प्रमाण ५८.२५ टक्के इतके आहे, तर स्त्री कामगारांची एकूण संख्या ८१ इतकी म्हणजे एकूण ऊस तोड कामगारांशी प्रमाण ४१.७५ टक्के इतके आहे. सर्वेक्षणातील उचदाते हे सर्वच्या सर्व (९०) पुरुष कामगार आहेत अधिक कुटुंबातील इतर नातेवाईक पुरुष २३ म्हणजे एकूण ११३ इतके पुरुष आहेत. कुटुंबातील इतर नातेवाईकात पुरुष कामगारांचे (वडील, भाऊ, मुलगा) प्रमाण २२.१२ टक्के इतके आहे. कुटुंबाबरोबर आलेल्या स्त्री कामगारांमध्ये ५७ इतक्या पत्नी व २४ इतर स्त्री कामगार उचदात्यांच्या भावजई, आई, बहिण व मुलगी अशा नातेवाईक असून त्यांची एकूण संख्या ८१ इतकी आहे. अशारितीने एकूण ऊस तोडणी कामगारांपैकी पुरुष कामगारांची संख्या व प्रमाण हे स्त्री कामगारा-

पेक्षा थोडे जास्त असल्याचे आढळते. परंतु यामध्ये फार मोठी तफावत असल्याचे आढळून येत नाही.

३.३.२ ऊस तोड कामगारांची वयोमानानुसार रचना -

ऊस तोड कामगारांची वयोगटानुसार रचना अभ्यासताना उत्तरदाते ऊस तोड कामगार व कुटुंबातील इतर नातेवाईक कामगार त्याचबरोबर स्त्री व पुरूष कामगार अशी विभागणी केलेली आहे.

कोष्टक क्र.३.४

ऊस तोड कामगारांचे वयोगटानुसार वर्गीकरण

| अनु. | वयोगट वर्षे | उत्तरदाते ऊस तोड कामगार | | | | इतर कुटुंबिय ऊस तोड कामगार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्रिया | एकूण | शे. प्रमाण | पुरूष | स्त्रिया | एकूण | शेकडा प्रमाण |
| १. | १५ पर्यन्त | - | - | - | - | २ | ६ | ८ | ७.७० |
| २. | १६ ते २५ | ३२ | - | ३२ | ३५.५६ | ११ | ३० | ४१ | ३९.४३ |
| ३. | २६ ते ३५ | २६ | - | २६ | २८.८९ | ८ | २५ | ३३ | ३१.७४ |
| ४. | ३६ ते ४५ | २२ | - | २२ | २४.४५ | २ | १४ | १६ | १५.३५ |
| ५. | ४६ ते ५५ | ७ | - | ७ | ७.७७ | - | ४ | ४ | ३.८५ |
| ६. | ५६ पेक्षा अधिक | ३ | - | ३ | ३.३३ | - | २ | २ | १.९३ |
| | एकूण : | ९० | - | ९० | १००.०० | २३ | ८१ | १०४ | १००.०० |

कोष्टक क्र. ३.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे उत्तरदाते ऊसतोड कामगार १५ वर्षा खालील कोणीही नाहीत. १६ ते ४५ या वयोगटातील संख्या ८० इतकी म्हणजे एकूण उत्तरदात्या ऊस तोड कामगारांशी ८९ टक्के इतकी आहे, तर ४६ वर्षावरील उत्तरदात्या ऊस तोड कामगारांची संख्या १० इतकी असून त्याचे प्रमाण ११ टक्के इतके आहे.

उत्तरदाते व कुटुंबातील इतर नातेवाईक स्त्री-पुरूष कामगार यांचा एकत्रित विचार केल्यास एकूण १९४ ऊस तोड कामगारांपैकी ८ स्त्री-पुरूष कामगार १५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील असून त्यांचे एकूण कामगारांशी प्रमाण ४.१३ टक्के इतके आहे. १६ ते ४५ वर्षे वयोगटातील स्त्री-पुरूष ऊस तोड कामगारांची संख्या १७० इतकी असून त्यांचे एकूण ऊस तोड कामगारांशी प्रमाण ८७.६२ टक्के इतके आहे. ४६ वर्षापेक्षा अधिक वयोगटातील स्त्री-पुरूष कामगारांची संख्या १६ इतकी असून त्यांचे एकूण कामगारांशी प्रमाण ८.२५ टक्के इतके आहे. यावरून आपणास असे अनुमान काढता येते की, ऊस तोडणीच्या कामावर असणारे स्त्री-पुरूष कामगार हे बहुतेक १६ ते ४५ वर्षे या वयोगटात (तरूण वर्गात) मोडणारेच आहेत.

### ३.३.३ उत्तरदात्या ऊस तोड कुटुंबाची मातृभाषा -

कोष्टक क्र. ३.५

ऊस तोड कामगार कुटुंबाचे मातृभाषेनुसार वर्गीकरण

| अनु. | मातृभाषा | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठी | ८२ | ९१.१० |
| २. | कन्नड | ०८ | ८.९० |
| | एकूण : | ९० | १००.०० |

ऊस तोड कामगार कुटुंबाचे मातृभाषेनुसार वर्गीकरण कसे आहे याचे स्पष्टीकरण कोष्टक क्र. ३.५ मध्ये मिळते. बहुतेक ऊस तोड कामगार हे महाराष्ट्र राज्यातील असल्याने मराठी बोलणाऱ्या कुटुंबाची संख्या जास्त आहे. एकूण कामगार कुटुंबापैकी ८२ कामगार कुटुंबे मराठी भाषा बोलणारी

आहेत. मराठी भाषा बोलणाऱ्या कामगार कुटुंबाचे प्रमाण एकूण कामगार कुटुंबांच्या ९१.१ टक्के इतके आहे. कर्नाटक राज्यातून ऊस तोडणीच्या कामासाठी आलेल्या कुटुंबांची संख्या १३ इतकी आहे. परंतु ती कामगार कुटुंबे महाराष्ट्राच्या सीमेनजिकच्या गावातूनच आलेली असल्याने त्यातील काही कुटुंबांची मातृभाषा ही मराठीच आहे. केवळ ८ कुटुंबांची मातृभाषा कन्नड ही असून त्यांचे एकूण कामगार कुटुंबाशी असणारे प्रमाण केवळ ८.९ टक्के इतकेच आहे, त्यामुळे मराठी भाषेचे प्रमाण जास्त आहे.

३.३.४ ऊस तोड कामगार कुटुंबांचा वैवाहिक दर्जा -

कोष्टक क्र.३.६

उचरदात्या ऊस तोड कामगारांचे वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण

| अनु. | वैवाहिक दर्जा | उचरदात्यांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | विवाहित | ७५ | ८४.४४ |
| २. | अविवाहित | ११ | १२.२३ |
| ३. | विधूर | ३ | ३.३३ |
| ४. | विधवा | - | - |
| | एकूण : | ९० | १००.०० |

उचरदात्या ऊस तोड कामगारांपैकी बहुतेक म्हणजे ८४.४४ टक्के कामगार हे विवाहित असल्याचे आढळून आले. बहुतेक कामगार ग्रामीण असून धनगर जातीचे असल्याने व त्यांच्यात विवाह लवकर करण्याची प्रथा असल्याने

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

विवाहितांची संख्या जास्त असावी असे वाटते. अविवाहितांची संख्या ११ इतकी असून एकूण कामगारांशी शेकडा प्रमाण १२.३३ इतके आहे. विधुरांची संख्या लहान असून त्यांचे प्रमाण ३,३३ टक्के इतके असल्याचे आढळते. तर उचरदात्या ऊस तोड कामगारामध्ये स्त्रिया नसल्याने विधवांची संख्या देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे कोष्टक ३.६ मध्ये विधवांची संख्या व प्रमाण दिलेले नाही.

### ३.३.५ उचरदात्या ऊस तोड कामगारांचे जातीनुसार वर्गीकरण -

ऊस तोड कामगारांच्या सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, केवळ २.२२ टक्के कामगार कुटुंबे मुस्लिम धर्माची असून राहिलेली सर्व ९७.८८ टक्के कुटुंबे ही हिंदु धर्माची आहेत. सर्व ऊस तोड कामगार कुटुंबांचे जातीनुसार वर्गीकरण कोष्टक क्रमांक ३.७ मध्ये दाखविल्याप्रमाणे आहे. एकूण उचरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबापैकी मराठा जातीची ३९ कुटुंबे (४३.३४ टक्के) धनगर व नाईक जातीच्या कुटुंबांची संख्या ३४ (३७.७८ टक्के), कोळी जातीची ४ (४.४४ टक्के) व हरिजन जातीतील म्हणजे महार, मांग यांची कुटुंबे ६ (६.६६ टक्के), मुसलमान जातीची २ कुटुंबे (२.२२ टक्के) तसेच इतर बलुतेदार व मटक्या जमातीतील म्हणजे चांभार, लोहार, वंजारी, गोंधळी या कुटुंबांची संख्या ५ (५.५६ टक्के) इतकी असल्याचे आढळते. थोडक्यात आपणास असे अनुमान काढता येईल की ऊस तोडणी कामगारांच्यामध्ये मराठेत्तर जातीचे प्रमाण जास्त आहे. विशेषत: धनगर व इतर जातीतील जास्त कामगार कुटुंबे ऊस तोडणीच्या कामासाठी आलेली आहेत असे दिसते.

कोष्टक क्र. ३.७

उचरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचे जातीनुसार वर्गीकरण

| अनु. | जात | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मराठा | ३९ | ४३.३४ |
| २. | धनगर | ३४ | ३७.७८ |
| ३. | कोळी | ४ | ४.४४ |
| ४. | हरिजन | ६ | ६.६६ |
| ५. | मुसलमान | २ | २.२२ |
| ६. | इतर (चांभार, लोहार, बंजारी, गोंधळी) | ५ | ५.५६ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

३.३.६ ऊस तोड कामगारांचा शैक्षणिक दर्जा -

उचरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबामध्ये निरक्षरांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळते. एकूण उचरदात्या ऊस तोड कामगारांपैकी ६० कामगार निरक्षर असून एकूण उचरदात्या कामगारांशी निरक्षरांचे प्रमाण ६६.६७ टक्के इतके आहे, तर साक्षरांचे प्रमाण ३३.३३ टक्के इतके आहे. साक्षर असणाऱ्या कामगारांमध्ये ४ थीपर्यन्त शिक्षण झालेल्यांची संख्या १४ (१५.१६ टक्के) आहे, ७ वी पर्यन्त शिक्षण झालेल्या कामगारांची संख्या ११ इतकी (११.२२ टक्के) आहे. यावरून असे म्हणता येईल की एकूण ऊस तोड कामगारांपैकी $\frac{2}{3}$ कामगार निरक्षर व केवळ $\frac{1}{3}$ कामगार साक्षर आहेत. ऊस तोड कामगारांच्या शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण कोष्टक

क्रमांक ३.८ मध्ये दिलेले आहे. उत्तरदात्याशिवाय इतर कामगारांची शैक्षणिक माहिती घेतली नसल्यामुळे येथे त्यांच्या शैक्षणिक दर्जाचा उल्लेख केलेला नाही.

कोष्टक क्र. ३.८

उत्तरदात्या ऊस तोड कामगारांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण

| अनु. | शिक्षणाचे प्रमाण | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | निरक्षर | ६० | ६६.६७ |
| २. | ४ थीपर्यन्त | १४ | १५.५६ |
| ३. | ७ वीपर्यन्त | ११ | १२.२२ |
| ४. | १० वीपर्यन्त | ५ | ५.५५ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

### ३.३.७ उचरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबातील मुलांची संख्या -

**कोष्टक क्र. ३.९**

**उचरदात्या कुटुंबाचे मुलांच्या संख्येनुसार वर्गीकरण**

| अनु. | कुटुंबातील मुलांची संख्या | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | मुले नाहीत | २७ | ३०.०० |
| २. | १ ते २ मुले | २७ | ३०.०० |
| ३. | ३ ते ४ मुले | ३३ | ३६.६७ |
| ४. | ५ पेक्षा अधिक | ३ | ३.३३ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.९ मध्ये उचरदात्या ऊस तोड कुटुंबांचे मुलांच्या संख्येनुसार वर्गीकरण पाहावयास मिळते. एकूण उचरदात्या कुटुंबापैकी २७ (३० टक्के) कुटुंबात एकही मूल नसल्याचे आढळते. कारण काही उचरदाते अविवाहित आहेत, काही उचरदात्यांची लग्ने नुकतीच झालेली आहेत व काही उचरदाते लग्ने होऊन बरीच वर्षे झालेली असली तरी त्यांना अजून अपत्य झालेले नाही, असेही सर्वेक्षणात आढळून आले. तसेच २७ (३० टक्के) उचरदात्यांना १ ते २ मुले आहेत, ३३ (३६.६७ टक्के) उचरदात्यांना ३ ते ४ मुले आहेत व पाच आणि पाचपेक्षा अधिक मुले असणाऱ्या उचरदात्यांची संख्या केवळ ३ (३.३३ टक्के) इतकीच आहे. यावरून आपण असे अनुमान काढू शकतो की, ऊस तोड कामगार ग्रामीण व बहुसंख्येने अशिक्षित असूनही त्यांना असणाऱ्या मुलांची संख्या तशी कमी आहे. १ ते ४ मुले असणाऱ्या

उत्तरदात्यांची संख्या ६० (६६.६७ टक्के) इतकी आहे. याचाच अर्थ असा होतो की, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातही कुटुंब नियोजनाचा प्रसार काही प्रमाणात झालेला आहे.

### ३.३.८ उत्तरदात्य ऊस तोड कामगार कुटुंबाचे आकारमान (कुटुंबातील सरासरी सदस्य संख्या)

कोष्टक क्र. ३.१०

उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबाचे आकारमानानुसार वर्गीकरण

| अनु. | कुटुंबातील सदस्य संख्या | कुटुंबाची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | १ ते २ | ३१ | ३४.४५ |
| २. | ३ ते ४ | ३७ | ४१.११ |
| ३. | ५ ते ६ | १९ | २१.११ |
| ४. | ७ पेक्षा अधिक | ३ | ३.३३ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

ऊस तोड कामगार कुटुंबाचे सरासरी आकारमान ३.४७ इतके आहे. कुटुंबाचे आकारमान ठरवितांना फक्त ऊस तोडणीच्या कामावर बरोबर असणाऱ्या सदस्यांचा विचार केलेला आहे. शाळेला जाणारी मुले, म्हातारे आई-वडील व इतर मूळ गांवी राहिलेल्या सदस्यांचा समावेश या कुटुंबात केलेला नाही. त्यांचा समावेश केल्यास कुटुंबाचे आकारमान वाढणार आहे.

कोष्टक क्रमांक ३.१० मध्ये दाखविल्याप्रमाणे १ ते २ सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३१ (३४.४५ टक्के) इतकी आहे, ३ ते ४ सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३७ (४१.११ टक्के), ५ ते ६ सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या १९ (२१.११ टक्के) व ७ पेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या ३ (३.३३ टक्के) इतकी आहे. ३ ते ४ सदस्य असणाऱ्या

कुटुंबांची संख्या सर्वात जास्त आहे.

### ३.३.९ ऊस तोड कामगार कुटुंबातील मिळवित्या सदस्यांची संख्या -

कोष्टक क्र. ३.११

उस तोड कामगार कुटुंबांच्या मिळवित्या सदस्यांच्या संख्येनुसार वर्गीकरण

| अनु. | मिळविते सदस्य संख्या | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एक | १६ | १७.७८ |
| २. | दोन | ६२ | ६८.८९ |
| ३. | तीन | ८ | ८.८९ |
| ४. | चार | - | - |
| ५. | पाच | ३ | ३.३३ |
| ६. | सहा | १ | १.११ |
| | एकूण : | ९० | १००.०० |

कोष्टक क्र. ३.११ मध्ये ऊस तोड कामगार कुटुंबातील मिळवित्या सदस्यांची संख्या दर्शविली आहे. कुटुंबातील मिळवित्या सदस्यांमध्ये स्त्री व पुरुष कामगार दोहोंचाही समावेश आहे. मिळवित्या सदस्यामध्ये उत्तरदाता कुटुंब प्रमुख, त्याची पत्नी व कुटुंबातील इतर नातेवाईक स्त्री-पुरुष कामगार (वडिल, भाऊ, मुलगा, आई, बहिण, मुलगी, भावजय) यांचा समावेश आहे. एकूण कुटुंबापैकी १६ कुटुंबे अशी आहेत की ज्यांच्यात मिळवित्या सदस्यांची संख्या एकच आहे, कारण ते एकटेच (कुटुंबाशिवाय)

ऊस तोडणीच्या कामावर आलेले आहेत. अशा कुटुंबांची टक्केवारी १७.७८ इतकी आहे. सर्वेक्षणामध्ये असेही आढळून आले की, जास्तीतजास्त कुटुंबात मिळवित्या सदस्यांची संख्या दोनच आहे. कारण एकूण कुटुंबापैकी ५७ कुटुंबे केवळ त्यांची पत्नी व लहान मुलांच्या बरोबर आलेले आहेत. ५ कुटुंबे केवळ एकच नातेवाईकां बरोबर आलेली आहेत. त्यामुळे केवळ दोनच मिळविते सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या ६२ (६८.८९ टक्के) इतकी आहे. अनुक्रमे ३, ५ व ६ मिळविते सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या अनुक्रमे ८ (८.८९), ३ (३.३३) व १ (१.११) टक्के इतकी आहे.

सर्वेक्षणावरून असेही आढळून आले की, उत्तरदात्या ऊस तोड कुटुंबातील काही सदस्य त्यांच्या मूळ गावी राहणारे आहेत. मूळ गावी राहणारे बहुतेक सदस्य शाळेला जाणारी मुले, म्हातारे आई-वडील आहेत. त्यामुळे एकूण कुटुंबापैकी ५३ (६० टक्के) कुटुंबांमध्ये मूळ गावी राहणाऱ्या सदस्यांमध्ये कोणीच मिळविते नाही, तर २७ कुटुंबामध्ये (३० टक्के) काही सदस्य मिळविते आहेत, की जे दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करतात तसेच मेंढ्या चारण्याचे काम करतात. २७ पैकी १७ कुटुंबात मिळवित्यांची केवळ १ इतकीच आहे व १० कुटुंबात मिळवित्यांची संख्या २ ते ३ इतकी आहे. थोडक्यात मूळ गावी राहणाऱ्या सदस्यांपैकी मिळवित्यांची संख्या तशी नगन्यच आहे. त्यामुळे मूळ गावी राहणाऱ्या सदस्यांचा भार सुध्दा ऊस तोडणीच्या कामावर असणाऱ्या मिळवित्या सदस्यांवरच पडतो असे अनुमान काढता येईल.

### ३.३.१० ऊस तोड कामगार कुटुंबातील न मिळवित्या (अवलंबित) सदस्यांची संख्या -

उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबातील अवलंबन असणाऱ्या सदस्यांची वर्गवारी दोन गटात केलेली आहे. पहिला वर्ग म्हणजे की जे कुटुंबाबरोबरच राहतात, यामध्ये प्रामुख्याने त्यांच्या लहान मुलांचा समावेश होतो. दुसऱ्या गटात मोडणारे न मिळविते हे मूळ गावी राहणारे असून यामध्ये शाळेला

जाणारी मुले, म्हातारे आई-वडील व कुटुंबातील अपंग व दीर्घकालीन आजारी सदस्यांचा समावेश होतो. न मिळवित्या (अवलंबित) सदस्यांची एकूण संख्ये-पैकी बरोबर असणाऱ्या सदस्यांपेक्षा मूळ गांवी राहणाऱ्या न मिळवित्या सदस्यांची संख्या अधिक आहे. याविषयीची सविस्तर माहिती कोष्टक क्रमांक ३.१२ मध्ये दाखविल्याप्रमाणे आहे. उत्तरदात्या एकूण ऊस तोड कामगार कुटुंबामध्ये अवलंबित सदस्य असणाऱ्या कुटुंबांची संख्या ५१ (५६.६७ टक्के) इतकी आहे, तर कुटुंबात कोणीच अवलंबून नाही अशा कुटुंबांची संख्या ३९ (४३.३३ टक्के) इतकी आहे. एकूण कुटुंबापैकी ३८ (४२.२२ टक्के) कुटुंबात अवलंबून असणाऱ्या सदस्यांची संख्या १ ते २ इतकी आहे व १३ (१४.४५ टक्के) कुटुंबात अवलंबून असणाऱ्या सदस्यांची संख्या ३ ते ५ इतकी आहे. १ ते २ सदस्य अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची संख्या अधिक आहे.

कोष्टक क्र. ३.१२

न मिळवित्या सदस्यांच्या संख्येनुसार ऊस तोड कामगार कुटुंबांचे वर्गीकरण

| न मिळवित्या सदस्यांची संख्या | ऊस तोड कामगार कुटुंबांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|
| | ऊस तोडणीच्या कामावर असणारी | शेकडा प्रमाण | मूळगावी राहणारी | शेकडा प्रमाण |
| १ | १७ | १८.८९ | १५ | १६.६६ |
| २ | २१ | २३.३३ | २३ | २५.५६ |
| ३ | ८ | ८.८९ | १८ | २०.०० |
| ४ | ४ | ४.४५ | ५ | ५.५६ |
| ५ | १ | १.११ | ४ | ४.४४ |
| ६ | - | - | - | - |
| एकही अवलंबून नाही | ३९ | ४३.३३ | २५ | २७.७८ |
| एकूण : | ९० | १००.०० | ९० | १००.०० |

उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबापैकी काही सदस्य त्यांच्या मूळ गांवी राहतात, त्यांच्यातील अवलंबितांचे प्रमाण अधिक आहे. एकूण कुटुंबापैकी ६५ (७२.२३ टक्के) कुटुंबात न मिळविल्या सदस्यांची संख्या आढळते, तर २५ (२७.७७ टक्के) कुटुंबात मूळ गांवी न मिळविल्या सदस्यांची संख्या आढळून येत नाही. एकूण कुटुंबापैकी ३८ (४२.२२ टक्के) कुटुंबात १ ते २ सदस्य न मिळविते आहेत, तर २७ (३० टक्के) कुटुंबात न मिळविल्या सदस्यांची संख्या ३ ते ५ इतकी आढळते.

## ३.४ ऊस तोड कामगारांच्या स्थलांतराची <u>भौगोलिक रचना, प्रमाण व स्वरूप</u> :


या विभागामध्ये सर्वेक्षणातील एकूण ऊस तोड कामगार कुटुंबापैकी स्थलांतरीत असणाऱ्या कामगार कुटुंबाविषयीच्या माहितीचे वर्णन खालील घटकांमध्ये केलेले आहे :

१) स्थलांतर भागाची तोंडओळख
२) स्थलांतर भागाची भौगोलिक रचना
३) स्थलांतराचे अंतर (प्रमाण) व दिशा
४) स्थलांतराचे स्वरूप
५) स्थलांतराची कारणे.

### ३.४.१ <u>स्थलांतर भागाची तोंडओळख</u> -

सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, ऊस तोडणीच्या कामासाठी आलेले स्थलांतरीत कामगार हे महाराष्ट्र राज्यातील ५ जिल्हे, १० तालुके व २७ गावांमधून तर कर्नाटक राज्यातील दोन जिल्हे, ४ तालुके व ७ गांवातून आलेले आहेत. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातून जेथून कामगार आलेले आहेत, त्या गावांची नावे, कारखान्यापासूनचे अंतर (कि.मी.मध्ये) तालुके व जिल्हे

# ऊसतोड कामगारांच्या स्थलांतराच्या भौगोलिक रचनेचा नकाशा



यांची नावे याविषयीची माहिती कोष्टक क्रमांक ३.१३ मध्ये दिलेली आहेत. एकूण उत्तरदात्या ऊस तोड कामगार कुटुंबापैकी १० ऊस तोड कामगार कुटुंबे स्थानिक आहेत व ८० ऊस तोड कामगार कुटुंबे स्थलांतरीत आहेत. त्यामुळे या कोष्टकात ८० ऊस तोड कामगार कुटुंबे कोठून आलेली आहेत याची माहिती दिलेली आहे. तसेच प्रत्येक मूळ गावामधून किती कामगार कुटुंबे आलेली आहेत यांची संख्या प्रत्येक जिल्ह्यातून किती यांची संख्या व एकूणाशी टक्केवारीही दिलेली आहे. तसेच ऊस तोड कामगारांचे मूळ गांव कारखान्यापासून किती अंतरावर (कि.मी.मध्ये) आहे याचे आकडेही कोष्टकामध्ये दिलेले आहेत.

कोष्टक क्र.३.१३

स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबांचे जन्म गांव, तालुका व जिल्हानिहाय विभागणी

| जिल्हा | तालुका | मूळगांव | कारखान्यापासूनचे अंतर (कि.मी.) | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | **महाराष्ट्र राज्य** | | | |
| सांगली | जत | उटगी | १४० | ५ | |
| | ८९ कि.मी. | संक | ११० | १ | |
| | | माडग्याळ | १२० | १ | |
| | | निगडी | ११५ | १ | |
| | | सिंदूर | १२६ | ५ | |
| | | | | १३ | |
| | कवठे महांकाळ ४८ कि.मी. | आगळगांव | ७३ | १ | |

<u>कोष्टक क्र.३.१३</u> (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | आटपाडी | झरे | १०२ | १ | |
| | ९५ कि.मी. | मिटकी | ११९ | ४ | |
| | | वाळेवाडी | १२२ | ४ | |
| | | निंबवडे | १०२ | १ | |
| | | गोमेवाडी | ७० | ३ | |
| | | अर्जुनवाडी | ९२ | १ | |
| | | करगणी | ७५ | १ | |
| | | हिवताड | ७५ | १ | |
| | | | | १६ = ३० | ३७.५० |
| सोलापूर | मंगळवेढा | मोसे | १५८ | ४ | |
| | १४० कि.मी. | नंदेश्वर | १५५ | १ | |
| | | चिकली | १७० | २ | |
| | | फडतरवाडी | १९० | ४ | |
| | | रेड्ड | १५७ | ७ | |
| | | लुपसिंगी | १६० | ५ | |
| | | | | २३ | |
| | सांगोला | वाणी | १५८ | ३ | |
| | १०८.८ कि.मी. | चिंचोळे | | | |
| | | | | = २६ | ३२.५० |
| बीड | आष्टी | कान्डी | २५१ | ४ | |
| | ३१५ कि.मी. | | | | |
| | कैज | कैंद्रवाडी | २७८ | १ | |
| | २९५ कि.मी. | लोपटेवाडी | २९५ | १ | |
| | | | | २ | |

कोष्टक क्र. ३.१३ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| | बीड<br>२८५ कि.मी. | मान्याचावाडा | ३०१ | १<br>=७ | ८.७५ |
| अहमदनगर | कर्जत<br>२२९ कि.मी. | गोईकरवाडी | ३२५ | ३ | ३.७५ |
| कोल्हापूर | कागल<br>७१ कि.मी. | गोरंबे | ८६ | १ | १.२५ |

कर्नाटक राज्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बेळगाव | अथणी<br>७२ कि.मी. | फडतरवाडी<br>तेलंगवाडा<br>जमगी<br>अजुर | ८३<br>५०<br>४७<br>६६ | ७<br>१<br>१<br>१<br>---<br>१० | |
| | चिकोडी<br>७० कि.मी. | हातनाळ | ६४ | १<br>=११ | १३.७५ |

कोष्टक क्र. ३.१३ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
|---|---|---|---|---|---|
| विजापूर | सिंदगी १८८ कि.मी. | चेड्डरकी | १५८ | १ | |
| | जमखंडी ११३ कि.मी. | बेळगी | ९० | १ =२ | २.५० |
| महाराष्ट्र राज्य (एकूण) | | | | | |
| ५ | १० | २७ | - | ६७ | ८३.७५ |
| कर्नाटक राज्य (एकूण) | | | | | |
| २ | ४ | ७ | - | १३ | १६.२५ |
| ७ | १४ | ३४ | - | ८० | १००.०० |

टीप : कोष्टकातील रकाना क्र. ६ मधील अंक जिल्ह्यांची टक्केवारी दर्शवितात.

### ३.४.२ स्थलांतराची भौगोलिक रचना -

स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबे कोठून आलेली आहेत ? त्यांचे मूळ गांव कोणते ? त्यांचे जन्मगांव कोणत्या जिल्ह्यात आहे ? कोणत्या राज्यात आहे ? हे अभ्यासणे म्हणजे स्थलांतर भागाची भौगोलिक रचना अभ्यासणे होय.

स्थलांतरीत ऊस तोड कामगारांचे मूळगांव, जिल्हा, राज्य यांचा विचार करता, अभ्यासाच्या सोयीसाठी त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे तीन गटांत केलेली आहे.

अ) जिल्हांतर्गत स्थलांतर

ब) आंतर-जिल्हा स्थलांतर

क) आंतर-राज्य स्थलांतर.

ऊस तोड कामगार कुटुंबांच्या नमुना पाहणीवरून असे आढळून येते की, जिल्हांतर्गत स्थलांतर सांगली जिल्हात झाले आहे. सांगली जिल्हाच्या पूर्वभागातील काही तालुक्यातील खेड्यातून बरीच कुटुंबे ऊस तोडणीच्या कामासाठी स्थलांतरीत झालेली आहेत. कोष्टक क्रमांक ३.१३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे सांगली जिल्हातील जत, आटपाडी व कवठेमहंकाळ या तीन तालुक्यातील १४ खेड्यातून ऊस तोड कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. सांगली जिल्हातील हा पूर्वभाग पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडणारा व दुष्काळी भाग आहे. एकूण स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबापैकी ३० (३७.५० टक्के) कुटुंबे सांगली जिल्हातील या तीन तालुक्यातून स्थलांतरीत झालेली असून यापैकी सर्वात जास्त आटपाडी तालुक्यातून व त्यानंतर अनुक्रमे जत व कवठेमहंकाळ तालुक्यांतून आलेली आहेत. स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबांची तालुका-निहाय संख्या व टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे. आटपाडी - १६ (५३.३४ टक्के), जत - १३ (४३.३३ टक्के) व कवठे महंकाळ १ (३.३३ टक्के).

आंतर-जिल्हा स्थलांतरामध्ये सोलापूर, कोल्हापूर, बीड व अहमदनगर या चार जिल्हांचा समावेश होतो. यापैकी सोलापूर जिल्हाचा वाटा मोठा आहे. सोलापूर जिल्हातून एकूण स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबापैकी २६ (३७.५ टक्के) कुटुंबे मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील ७ खेड्यातून आलेली आहेत. सोलापूर जिल्हात मंगळवेढा तालुक्याचा वाटा मोठा असून, या तालुक्यातून एकूण ६ खेड्यातून एकूण २३ (८८.४७ टक्के) कामगार कुटुंबे आलेली असून सांगोला तालुक्यातील केवळ एका खेड्यातून ३ (११.४३ टक्के) ऊस तोड कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत.

बीड, अहमदनगर व कोल्हापूर जिल्ह्यांतून स्थलांतर झालेल्या कामगार कुटुंबांची संख्या अल्प असून त्यांची टक्केवारी अनुक्रमे बीड - ८.७५ टक्के, अहमदनगर - ३.७५ टक्के व कोल्हापूर - १.२५ टक्के इतकीच आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी, बीड व केज या तालुक्यातून अनुक्रमे ५७.१५ टक्के, १४.२८ टक्के व २८.५७ टक्के इतकी कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. तर अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील गोईकरवाडी या खेड्यातून सर्वच्या सर्व म्हणजे ३ (१०० टक्के) कामगार कुटुंबे व कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील गोरंबे या खेड्यातून एक (१०० टक्के) कामगार कुटुंब स्थलांतरीत झालेले आहे. आंतर जिल्हा स्थलांतरामध्ये स्थलांतरीत कामगारांच्या कुटुंबांच्या संख्येवरून सोलापूर, बीड, अहमदनगर व कोल्हापूर असा क्रम लागतो. अशारितीने सर्वेक्षणातील एकूण ८० स्थलांतरीत कामगार कुटुंबापैकी ६७ (८३.७५ टक्के) कामगार कुटुंबे महाराष्ट्र राज्यातील ५ जिल्हे, १० तालुके व १० तालुक्यातील निरनिराळ्या २७ खेड्यांतून आलेली आहेत.

एकूण स्थलांतरीत कामगार कुटुंबापैकी १३ (१६.२५ टक्के) कुटुंबाचे स्थलांतर हे आंतर-राज्य स्वरूपी आहे. ही स्थलांतरीत कामगार कुटुंबे कर्नाटक राज्यातून परंतु महाराष्ट्र राज्याच्या सीमेनजिक असणाऱ्या खेड्यांतून आलेली आहेत. कर्नाटक राज्यातील महाराष्ट्र राज्याच्या सीमेजवळ असणाऱ्या बेळगांव व विजापूर या दोन जिल्ह्यांतून ऊस तोड कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली असून यामध्ये बेळगांव जिल्ह्याचा वाटा मोठा आहे. एकूण स्थलांतरीत कामगार कुटुंबांच्या १३.७५ टक्के कामगार कुटुंबे बेळगांव जिल्ह्यातील अथणी व चिक्कोडी या तालुक्यातून स्थलांतरीत झालेली असून यापैकी अथणी तालुक्यातून ९०.९० टक्के व चिक्कोडी तालुक्यातून ९.१० टक्के कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. तसेच विजापूर जिल्ह्यातून एकूण स्थलांतरीत कामगार कुटुंबांच्या केवळ २.५० टक्के इतकीच कुटुंबे स्थलांतरीत झालेली असून या जिल्ह्यातील सिंदगी

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

तालुक्यातून ५० टक्के व जमखंडी तालुक्यातून ५० टक्के म्हणजे निम्मी निम्मी कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. अशारितीने कर्नाटक राज्यातील दोन जिल्ह्यातून, या दोन जिल्ह्यातील चार तालुक्यातून व सात खेड्यांतून एकूण १३ (१६.२५ टक्के) कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत.


थोडक्यात जिल्ह्यांतर्गत, आंतर-जिल्हा व आंतर-राज्य यांचा एकत्रित विचार करता, आपल्या सर्वेक्षणातील ८० ऊस तोड कामगार कुटुंबांचे स्थलांतर महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील ७ जिल्हे, १४ तालुके व या १४ तालुक्यातील एकूण ३४ खेड्यांतून झालेल्याचे निदर्शनास येते. या संपूर्ण स्थलांतर भागाची भौगोलिक रचना दर्शविणारा पाय-चार्ट आकृती क्र. १ मध्ये दर्शविला आहे.

३.४.३ <u>स्थलांतराच्या अंतराचे प्रमाण</u> -

ऊस तोड कामगार कुटुंबाचे जन्मगाव ते स्थलांतराचे ठिकाण यांच्यामधील अंतर म्हणजे स्थलांतराचे प्रमाण होय. स्थलांतरीत कामगार कुटुंबांचे जन्मगाव ते वसंत (दादा) शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली यामधील अंतर किती आहे हे कोष्टक क्रमांक ३.१३ मधील रकाना क्र. ४ मध्ये दर्शविले आहे.

सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील स्थलांतरीत कुटुंबांची जन्मगावे यांचा विस्तार (रेंज) ११० ते १२६ कि.मी. अंतरामध्ये आहे. सांगली जत व मूळगावे यांच्यातील सरासरी अंतर १२२.२ कि.मी. इतके आहे. आटपाडी तालुक्यातील स्थलांतरीत कुटुंबांच्या मूळगावचा विस्तार ७० ते १२२ कि.मी. अंतर इतका आहे. सांगली ते आटपाडी व कवठे महांकाळ या जिल्ह्यातील मूळगावे यांच्यामधील सरासरी अंतर अनुक्रमे ९४.६२ कि.मी. व ७३ कि.मी. इतके आहे. सांगली जिल्ह्यांतर्गत झालेल्या स्थलांतरीत कुटुंबांच्या सर्व मूळ गावांचे सरासरी अंतर १०२.९२ कि.मी. इतके आहे. थोडक्यात सांगली

# स्थलांतरीत भागाची भौगोलिक रचना




सांगली जिल्हा
१ जत तालुका
२ आटपाडी ,,
३ कवठेमहंकाळ ,,

सोलापूर जिल्हा
४ मंगळवेढा ,,
५ सांगोला ,,

बीड जिल्हा
६ आष्टी तालुका
७ बीड ,,
८ कैज ,,

अहमदनगर जिल्हा
९ कर्जत तालुका

कोल्हापूर जिल्हा
१० कागल ,,

बेळगाव जिल्हा
११ अथणी ,,
१२ चिक्कोडी ,,

विजापूर जिल्हा
१३ सिंदगी ,,
१४ जमखंडी ,,

आकृति नं. १

जिल्हातील स्थलांतराचे सरासरी प्रमाण अंतर १०२.९२ कि.मी. इतके आहे.

आंतर-जिल्हा स्थलांतराच्या अंतराबाबतचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे. सोलापूर जिल्हातील मंगळवेढा तालुक्यातील विविध मूळगावांच्या अंतराचा टप्पा १५५ ते १९० कि.मी. इतका आहे. सोलापूर जिल्हातील मंगळवेढा व सांगोला या दोन तालुक्यातून ऊस तोडणी कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली आहेत. या दोन तालुक्यातील ७ खेडयातून कामगार सांगली साखर कारखान्याच्या परिसरात ऊस तोडणीच्या कामासाठी आलेले आहेत. सांगली ते मंगळवेढा व सांगोला या दोन तालुक्यातील मूळगावापासूनचे सरासरी अंतर अनुक्रमे १६५ कि.मी. व १५८ कि.मी. इतके आहे. सोलापूर जिल्हातील सर्व मूळगांवे ते सांगली यामधील सरासरी अंतर १६४ कि.मी. इतके आहे. तसेच बीड जिल्हातून एकूण तीन तालुक्यांतून व चार खेडयांतून कामगार ऊस तोडणीच्या कामावर आलेले आहेत. बीड जिल्हातील आष्टी, केज व बीड तालुक्यातील कामगारांच्या मूळगावांच्यामधील अंतराचा टप्पा अनुक्रमे २५१ कि.मी., १७८ ते २९५ कि.मी. व ३०१ कि.मी. इतका आहे. तसेच बीड जिल्हातील या तीन तालुक्यातील मूळगांवे ते सांगली यामधील सरासरी अंतर अनुक्रमे २५१ कि.मी., २८६.५ कि.मी. व ३०१ कि.मी. इतके असून सांगली ते बीड जिल्हातील स्थलांतरीत कामगार कुटुंबांची सर्व मूळगावे यामधील सरासरी अंतर २८१.२५ कि.मी. इतके आहे. तसेच अहमदनगर जिल्हातील कर्जत तालुक्यातील गोईकरवाडी या एकाच खेडयातून ३ कामगार कुटुंबे स्थलांतरीत झालेली असून सांगली ते गोईकरवाडी हे अंतर ३२५ कि.मी. इतके आहे. तसेच कोल्हापूर जिल्हातील कागल तालुक्यातील गोरंबे या खेडयातील एक बैलगाडीवान कुटुंब स्थलांतरीत झालेले असून गोरंबे ते सांगली हे अंतर ८६ कि.मी. इतके आहे. त्यामुळे अहमदनगर व कोल्हापूर जिल्हातील सर्व


मूळगांवे व सांगली यामधील सरासरी अंतर अनुक्रमे ३२५ कि.मी. व ८६ कि.मी. इतके आहे.

आंतर-राज्य स्थलांतराच्या अंतराच्या प्रमाणाबाबत माहिती खालीलप्रमाणे आहे. आंतरराज्य स्थलांतर हे कर्नाटक राज्यातील बेळगांव व विजापूर या दोन जिल्ह्यांतून झालेले असून यापैकी बेळगांव जिल्हातील अथणी या तालुक्यातील स्थलांतरीत कामगार कुटुंबांच्या मूळगावाच्या अंतराचा टप्पा ४७ ते ८३ कि.मी. इतका आहे. तर सांगली ते या तालुक्यातील मूळगांवे यांच्यामधील सरासरी अंतर ६१.५ कि.मी. इतके आहे. बेळगांव जिल्हातील चिक्कोडी तालुक्यातील हातनाळ व विजापूर जिल्हातील सिंदगी व जमखंडी या तालुक्यातून अनुक्रमे चेडुरकी व बेळगी या प्रत्येकी एक एक मूळ खेड्यातून कामगारांचे स्थलांतर झालेले दिसून येते. म्हणून सांगली ते हातनाळ, चेडुरकी व बेळगी यामधील अंतर अनुक्रमे ६० कि.मी., १५८ कि.मी. व ९० कि.मी. इतके आहे. बेळगांव व विजापूर या जिल्हातील सर्व मूळगांवे व सांगली यामधील सरासरी अंतर अनुक्रमे ६२ कि.मी. व १२४ कि.मी. इतके आहे. आकृती क्रमांक २ मध्ये स्तंभालेखाच्या सहाय्याने स्थलांतराच्या सरासरी अंतराचे जिल्हानिहाय प्रमाण दिलेले आहे. या स्तंभालेखावरून आपल्या असे निदर्शनास येते की, आंतरराज्य स्थलांतरापेक्षा राज्यातल्या राज्यात होणाऱ्या कामगारांच्या स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. कारण आंतरराज्य स्थलांतर होत असताना सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक समस्या निर्माण होत असतात, तसेच वेगळ्या घटक राज्य सरकारची स्थलांतरावर बंधने असण्याचीही शक्यता असते.

### ३.४.४ स्थलांतराचे स्वरूप -

स्थलांतराचे स्वरूप म्हणजे स्थलांतरीत कामगार एकटा आलेला आहे की त्याच्या कुटुंबासह आलेला आहे, हे सांगणे होय. तरूण व अविवाहित कामगारच अधिक प्रमाणात स्थलांतरीत होण्याची शक्यता असते. काही वेळेला

## स्थलांतराच्या अंतराचे प्रमाण




आकृति नं. २

नव्याने लग्न झालेले जोडपे स्थलांतरीत होत असते, तर काहीवेळेस पती-पत्नी व लहान मुले यांचे स्थलांतर होत असते. ते आपली काही मोठी मुले (शाळेला जाणारी वगैरे) त्यांच्या मूळगावी त्यांच्या म्हाता-या आई-वडिलांच्या-जवळ ठेवून येण्याची शक्यता असते. परंतु मुलांची व्यवस्था पाहण्यासाठी मूळगांवी कोणी नसेल तर कुटुंबे आपल्या सर्व लहान-मोठया मुलासह स्थलांतरीत होत असतात. काही कुटुंबे आपल्या बायकामुलाशिवाय कुटुंबातील (भाऊ, बहिण, आई-वडील, भावजय इत्यादी) इतर नातेवाईकांसह स्थलांतरीत होण्याची शक्यता असते.

कोष्टक क्र. ३.१४

स्थलांतराच्या स्वरूपानुसार ऊस तोड कामगार कुटुंबांचे वर्गीकरण

| अनु. | तपशील | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | एकटा (कुटुंबाशिवाय) | १० | १२.५० |
| २. | केवळ पत्नीसह | ११ | १३.७५ |
| ३. | पत्नी व लहान मुलांसह | २० | २५.०० |
| ४. | पत्नी व लहान-मोठया सर्व मुलासह | १७ | २१.२५ |
| ५. | पत्नी, मुले व इतर नातेवाईकासह (भाऊ, बहिण, आई, वडील) | २२ | २७.५० |
| | एकूण : | ८० | १००.०० |

सर्वेक्षणातील एकूण ९० ऊस तोड कामगार कुटुंबापैकी १० ऊस तोड कुटुंबे स्थानिक आहेत व ८० ऊस तोड कुटुंबे स्थलांतरीत आहेत. कोष्टक

क्रमांक ३.१४ मध्ये या ८० स्थलांतरीत ऊस तोड कामगार कुटुंबाचे स्वरूप कसे आहे, याचा तपशील दिलेला आहे. सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, एकूण स्थलांतरीत कामगारांपैकी १० ऊस तोड कामगार(कुटुंबाशिवाय) एकटे आलेले आहेत. कारण ते अविवाहित आहेत. शिवाय कुटुंबासह स्थलांतर करण्यामध्ये अनेक समस्या उद्भवत असतात, म्हणून त्यांनी इतर नातेवाईकही बरोबर आणले नसावेत. अशा कुटुंबाशिवाय कामगारांचे एकूण स्थलांतरीत कामगाराशी शेकडा प्रमाण १२.५० इतके आहे. तसेच सर्वेक्षणापैकी काही नवविवाहित केवळ आपल्या पत्नीसह स्थलांतरीत झालेले आहेत. अशा स्थलांतरीत नवविवाहित जोडप्यांची संख्या ११ इतकी असून त्याचे एकूण स्थलांतरीत कामगार कुटुंबाशी प्रमाण १३.७५ टक्के इतके आहे. एकूण स्थलांतरीत कामगार कुटुंबापैकी २० (२५ टक्के) कुटुंबे पत्नी व केवळ लहान मुलासह तर १७ (२१.२५ टक्के) कुटुंबे पत्नी व लहान मोठया सर्व मुलांसह स्थलांतरीत झालेली आहेत. तसेच स्थलांतरीत कुटुंबापैकी २२ कुटुंबे अशी आहेत की, त्यांच्यातील काहींच्या बरोबर पत्नी, मुले व इतर नातेवाईक आहेत, काही कामगारा बरोबर पत्नी नाही, परंतु काम करणारी मोठी मुले व इतर नातेवाईक आहेत, काही कामगार असे आहेत की, त्यांच्या बरोबर मुले नाहीत परंतु पत्नी व इतर नातेवाईक आहेत, तर काही कामगार असे आहेत की, त्यांच्याबरोबर पत्नी व इतर नातेवाईक नाहीत परंतु स्वयंपाकासाठी एखादी मुलगी बरोबर आहे. अशा कामगार कुटुंबांचे एकूण स्थलांतरीत कुटुंबाशी शेकडा प्रमाण २७.५० इतके आहे. वरील कोष्टकावरून हेही स्पष्ट होते की एकटे (कुटुंबाशिवाय) स्थलांतरीत होणाऱ्यांची संख्या व प्रमाण अल्प आहे. पत्नी, लहान व मोठया मुलांसह म्हणजे संपूर्ण कुटुंबासह स्थलांतराचे प्रमाण अधिक म्हणजे ४६.२५ टक्के इतके आहे. त्याच्या खालोखाल एकत्र कुटुंबासह (कुटुंबातील इतर नातेवाईकासह) स्थलांतराचे प्रमाण २७.५० टक्के इतके आहे.

### ३.४.५ स्थलांतराची कारणे -

या विभागामध्ये आपण ऊस तोड कामगार कुटुंबाच्या स्थलांतराची कारणे कोणती आहेत, याविषयी विवेचन करणार आहोत. या कामगारांच्या स्थलांतराची कारणे देताना आपण स्थलांतर विषयीच्या ' उत्प्रेरण-आकर्षण ' सिध्दांताचा संदर्भ देऊ शकतो. कारण भारतातील अंतर्गत स्थलांतरास आकर्षण घटकापेक्षा उत्प्रेरण घटकच अधिक जबाबदार आहेत असे दिसून येते. अशिश बोस[१] यांचा स्थलांतर विषयक प्रश्न हा आहे की, भारताच्या ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे लोकसंख्येचे स्थलांतर का होऊ लागले आहे ? ग्रामीण भागातील वाढती बेकारी व शेतीवर सतत वाढत जाणारा लोकसंख्येचा भार यामुळे की लोकांना शहरी भागाचे आकर्षण आहे, शहरी भागातच चांगल्या रोजगारीच्या संधी उपलब्ध आहेत म्हणून ? अंतर्गत स्थलांतराच्या कारणाविषयी चर्चा करताना नॅशनल सॅम्पल सर्व्हे कमिटीने उत्प्रेरण व आकर्षण या घटकावरच भर दिलेला दिसून येतो.[२] परंतु भारतात असे दिसून येते की, अंतर्गत स्थलांतरास शहरी आकर्षणापेक्षा खेड्यातील वाईट आर्थिक परिस्थितीच अधिक जबाबदार आहे. कामगार शहराकडे आकर्षिले जात नाहीत, तर खेड्यांतील परिस्थितीमुळे ते खेड्यांमधून शहराकडे ढकलले जातात.[३]

सर्वेक्षणामध्ये ऊस तोड कामगार कुटुंबाच्या स्थलांतराची कारणे तपासताना कारणांची रचना उत्प्रेरण व आकर्षण या दोन घटकांच्या आधारावरच केलेली आहे. उत्प्रेरण या घटकात चार व आकर्षण या घटकात तीन कारणे दिलेली आहेत. उत्प्रेरण घटकामध्ये मूळगावी रोजगार मिळत नाही, तेथे वेतन कमी मिळते, कर्जबाजारीपणा कमी करणे व घरगुती भांडण तंटे यांचा समावेश होतो, तर आकर्षण घटकामध्ये स्वत:ची जमीन आहे परंतु चरितार्थाइतपत उत्पन्न मिळत नाही. आर्थिक परिस्थिती

सुधारण्याची इच्छा व इतर कारणांचा समावेश केला आहे. सर्वेक्षणमध्ये असे आढळून आले की, उत्प्रेक्षण घटकामध्ये मूळगावी वेतन कमी मिळते हे कारण स्थलांतरास अधिक प्रभावी ठरले आहे, तर आकर्षण या घटकात जन्मगांवी स्वत:ची जमीन आहे, परंतु त्या जमिनीतून पुरेसे उत्पन्न मिळत नसल्याने अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी स्थलांतरीत झालेले आहेत, हे कारण प्रभावी ठरलेले आहे.

कोष्टक क्र. ३.१५

उत्तरदात्यांचे स्थलांतराच्या कारणावरून वर्गीकरण

| अनु. | स्थलांतराची कारणे | उत्तरदात्यांच्या उत्तरांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| | अ) उत्प्रेक्षणात्मक कारणे - | | |
| १. | मूळ गावी रोजगार मिळत नाही. | ५ | २.८५ |
| २. | तेथे वेतन कमी मिळते. | ८० | ४५.४६ |
| ३. | कर्जबाजारीपणा कमी करणे. | ३९ | २२.१५ |
| ४. | घरगुती भांडण तंटा. | - | - |
| | | | = ७०.४६ |
| | ब) आकर्षणात्मक कारणे - | | |
| १. | स्वत:ची जमीन आहे परंतु उदरनिर्वाहाइतपत उत्पन्न मिळत नाही. | ५२ | २९.५४ |
| २. | आर्थिक परिस्थिती सुधारण्याची इच्छा | - | - |
| ३. | इतर कारणे | - | - |
| | एकूण : | १७६ | १००.०० |

टीप : उत्तरदात्यांनी स्थलांतराच्या एकापेक्षा अधिक कारणांना होकारार्थी उत्तरे दिलेली आहेत त्यामुळे उत्तरांची संख्या स्थलांतरीत उत्तरदात्यांच्या संख्येपेक्षा (८० पेक्षा) जास्त आहे.

कोष्टक क्र. ३.१३ मध्ये ऊस तोड कामगार कुटुंबांच्या स्थलांतराची कारणे व त्याचे प्रमाण याचे स्पष्टीकरण दिले आहे. या कोष्टकावरून आपण असे अनुमान काढू शकतो की स्थलांतरास उत्प्रेरणात्मक घटकच अधिक जबाबदार ठरलेले आहेत. कारण ७०.४६ टक्के कामगार उत्प्रेरणात्मक कारणावरून स्थलांतरीत झालेले आहेत, तर आकर्षणात्मक कारणावरून स्थलांतर होण्याचे प्रमाण २९.५४ टक्के इतके आहे. उत्प्रेरण घटकामध्ये मूळ गांवी वेतन कमी मिळते हे कारण अधिक प्रभावी ठरले असून या कारणामुळे झालेले स्थलांतर ४५.४६ टक्के इतके आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की ऊस तोड कामगार कुटुंबांच्या स्थलांतरास उत्प्रेरण घटक आकर्षण घटकापेक्षा अधिक कारणीभूत ठरलेले आहेत.

उत्तरदात्यांच्या स्थलांतराची भौगोलिक रचना त्यांचे जातीनुसार वर्गीकरण, त्यांच्या मूळ गावच्या रोजगारीची स्थिती व त्यांच्या मूळगावातील आर्थिक व सामाजिक स्थिती विचारात घेता त्यांच्या स्थलांतराच्या कारणांचे अधिक सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे देणे शक्य आहे.

१) जेथून कामगार स्थलांतरीत झालेले आहेत तो भाग म्हणजे सांगली जिल्हाचा पूर्व भाग, सोलापूर जिल्हाचा पश्चिम भाग, कर्जत, कर्नाटकातील बेळगांव व विजापूर जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्याच्या सीमेनजिकचा भाग, भौगोलिक दृष्टया पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडणारा व दुष्काळी आहे. त्यामुळे तेथे वर्षभर रोजगाराच्या संधी निर्माण होत नाहीत. तेथेच मिळणारे वेतनमान ही अल्प आहे. कारण सर्वेक्षणामध्ये असे आढळून आले की, १०० टक्के उत्तरदात्यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या मूळगावी महिन्यातून किमान ८ दिवस व कमाल १६ दिवस रोजगार मिळतो व दररोज मिळणारी मजुरी १० ते १५ रूपये इतकीच असते.

२) दुसरे महत्वाचे कारण म्हणजे स्थलांतरीत कामगारांचा भाग हा सदैव दुष्काळी असल्याने तेथे जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न आहे. चाऱ्याच्या अभावामुळे एकवेळ जनावरे विकली तर ती पुन्हा खरेदी करणे शक्य होत नाही म्हणून आहेत ती जनावरे जगविणे हेही कारण स्थलांतरास तितकेच महत्वाचे आहे. कारण ऊसाच्या वाढ्यावर जनावरे फुकट पोसता येतात.

३) एकूण उत्तरदात्यांपैकी ८० टक्के उत्तरदाते भूधारक आहेत व केवळ २० टक्के उत्तरदाते भूमीहीन आहेत. परंतु ८० भूधारकांपैकी बहुतेक अल्प व सीमान्त भूधारक आहेत. बहुतेक जमीनी माळरानाच्या व जिराईत आहेत. या जमिनीतून मिळणारे उत्पन्न हे जमिनीच्या मशागतीचा खर्च भरून काढण्याइतपतही नसते. त्यामुळे बहुतेक जमिनी पडीक आहेत. थोडक्यात या जमिनीतून उदरनिर्वाहाइतपत उत्पन्न मिळत नसल्याने भूधारक शेतकरीही ऊस तोडणीच्या कामासाठी स्थलांतरीत झालेले आहेत.

४) उत्तरदात्यांच्या परिच्यात्मक माहितीवरून असे दिसते की, उत्तरदाते हे बहुसंख्येने धनगर, हरिजन, बलुतेदार व मटक्या जमातीतील आहेत. त्यांची त्यांच्या मूळ गावात आर्थिक स्थिती वाईट आहे. म्हणूनच ते स्थलांतरीत झालेले आहेत.

स्थानिक कामगारसुध्दा वरील कारणावरूनच ऊस तोडणीच्या कामाकडे ओढलेले दिसतात. कारखान्याच्या परिसरात शेतमजूरीपेक्षा ऊस तोडणीच्या कामाचा अधिक मोबदला मिळतो, स्वत:ची जमीन आहे पण त्यातून उदरनिर्वाहाइतपत उत्पन्न मिळत नाही, व कर्जबाजारीपणा कमी करणे या कारणावरून स्थानिक कामगार ऊस तोडणीचे काम स्वीकारताना दिसतात. कारखाना परिसरातील आर्थिक विषमतेमुळेही काही कामगार ऊस तोडणीच्या कामावर येताना आढळतात.

## REFERENCES

1) Ashish Bose, "Why do People Migrate to Cities ?" Article in Yojana (Republic Day Annual Number), Vol. IX, No. 1, January 22, 1965.

2) Government of India, Report of the National Sample Survey, Number 53, Dehli, 1962, p. 62.

3) Report of the Royal Commission on Labour quoted in Dr. Prabhakar Deshmukh, Economics of Labour, Vidya Prakashan, Nagpur-2, p. 21.